# जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती.

************************************************************

क्र.प्र.अ/भु.सं/अ.का./कावि ५३८ /२०२१ दिनांक :-१३ / ०८ /२०२१

************************************************************

## "कलम १९"

## घोषणा (Declaration)

(भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)

**भु.सं.प्र.क्र. ५/४७/२०२०-२१, मौजा भातकुली भाग २ (अकृषक) ता. भातकुली जि.अमरावती**

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसुचना **क्र. २३९/२०२१, दि. २०/०४/२०२१** अन्वये प्रारंभीक अधिसुचना काढलेली आहे आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनूसुचि एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसुचि दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, **अमरावती** जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांनी, कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वेय दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त **सार्वजनिक प्रयोजनासाठी** उक्त जमिनीची आवश्यकत आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे **निम्न पेढी प्रकल्पाअंतर्गत चेचरवाडी ते (रामा-३०९ ते ) भातकुली कि.मी. ०/०० ते ४/११० रस्त्याचे एक लहान पुल व स्लॅबड्रेनसह पर्यायी रस्त्याचे बाधकामाकरीता** निर्धारित केले असल्याचे याव्दारे घोषित केले असुन, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी,उक्त अधिनियामान्वये जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी(भूसंपादन), ल.सिं.कामे, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती** यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची - एक
## जमिनीचे वर्णन

गाव- **भातकुली भाग २ (अकृषक)** तालुका- **भातकुली** जिल्हा - **अमरावती**

| अ.क्र | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (चौ.मी. मध्ये) |
|---|---|---|
| १ | ९४८/१३ | ८१.६० |
| २ | ९४८/१४ | १४४.९६ |
| ३ | ९४८/१५ | १६१.५४ |
| ४ | ९४८/१६ | १६१.५४ |
| ५ | ९४८/१७ | १३९.२९ |
| ६ | ९४८/१८ | १३९.२९ |
| ७ | ९४८/१९ | १३९.२९ |
| ८ | ९४८/२० | १३९.२९ |
| ९ | ९४८/२१ | १३९.२९ |
| १० | ९४८/२२ | १३९.२९ |
| | एकूण | **१३८५.३८** |

## अनुसूची - दोन
## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** :- निम्न पेढी प्रकल्पाअंतर्गत चेचरवाडी ते (रामा-३०९ ते ) भातकुली कि.मी. ०/०० ते ४/११० रस्त्याचे एक लहान पुल व स्लॅबड्रेनसह पर्यायी रस्त्याचे बाधकामाकरीता.

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- रस्त्याचे कामाकरीता

**समाजाला मिळणारे लाभ :-** सदर रस्ता हा निम्न पेढी प्रकल्पामूळे बाधीत होणाऱ्या रस्त्याकरीता पर्यायी रस्ता असून, सदर रस्त्याचे कामामुळे परिसरातील लोकांना शेतातील माल मुख्य बाजारपेठेमध्ये नेता येइल. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक लाभ होईल तसेच तरुणांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होतील. तसेच शालेय व आरोग्य विषयक सुविधेकरीता तालुक्याचे ठिकाणी जाण्या - येण्याकरीता जवळचा रस्ता तयार होईल.

## अनुसूची - तीन
## ( पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन )

**गावाचे नांव :- भातकुली भाग २** **तालुका :- भातकुली** **जिल्हा :- अमरावती**

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| **विस्थापन होत नसल्याने पुनर्वसातीची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक** | | |

## अनुसूची - चार

**( सदर प्रकरणी घरे/कुटूंबे बाधित होत नाहीत. सबब विस्थापन होत नसल्याने पुनर्वसनाची व पुनर्वसाहतीची (पुनर्स्थापनेची)आवश्यकता नाही.)**

**दिनांक :-** १३ /०८ /**२०२१**
**ठिकाण :- अमरावती.**

**उपजिल्हाधिकारी (भुसंपादन)**
**ल.सिं.कामे,अमरावती.**

**जिल्हाधिकारी अमरावती**